REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 1 | OCTOBER - 2022

# मराठीतील उद्योजकांच्या जीवनावरील चरित्रलेखनाच्या प्रेरणा

प्रा. डॉ. प्रवीण ताटे देशमुख
सहा. प्राध्यापक, मु.सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती.

## प्रस्तावना-




चरित्र या वाड्.मय प्रकाराने मराठी वाड्.मय समृद्ध केलेले दिसून येते. मराठीमध्ये चरित्र वाड्.मयाची परंपरा १२ व्या शतकापासून सुरू झालेली आहे. ती परंपरा आजतागायत अव्यातपणे सुरू आहे. महानुभाव पंथ, संतसाहित्य, पंडिती साहित्य, भाषांतर युग, अर्वाचीन साहित्य, स्वातंत्र्योत्तर कालखंड या सर्व कालखंडामध्ये चरित्र वाङ्मयाची निर्मिती झालेली दिसून येते. चरित्र लेखन हे एखाद्या सर्वसामान्य व्यक्तीवर न होता विविध कार्यक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीवर लिहिले गेलेले दिसून येते. चरित्रामध्ये चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा गुण-दोषासह शोध घेतला जातो. विशेषतः गुणांचे अधिकाधिक चित्रण करून दोष क्वचितच दाखवलेले दिसून येतात. अशी ही सत्यपूर्ण व कलात्मक व्यक्तीदर्शने चरित्ररूपाने आपणासमोर येतात. यामधून आपणाला आपली वैभवशाली परंपरा दिसून येते.

१ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राची स्थापना झाली. इंग्रजी राजवटी पासून भारताची आर्थिक राजधानी असलेली मुंबई महाराष्ट्रात आली आणि महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची गाडी जोराने धावू लागली. मुंबई ही फार पूर्वीपासून औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाते. स्वातंत्र्यानंतर भारताच्या औद्योगिक विकासाचे एक नवे पर्व सुरू झाले. याच काळात जमशेदजी टाटा, लक्ष्मणराव किर्लोस्कर, वालचंद हिराचंद, निळकंठराव कल्याणी इत्यादींचे पूर्वीपासूनचे सुरु असलेले उद्योग विश्व आणखीनच बहरला आले. या सर्वांनी भारताच्या आर्थिक विकासास मोठा हातभार लावलेला आहे. यापुढील काळात नानासाहेब दांडेकर, भवरलाल जैन, चांदमल कटारिया ,श्री. सत्यनारायण , डॉ. पा.स. खानखोजे, धीरूभाई अंबानी, लक्ष्मी मित्तल, नारायण मूर्ती, डी. एस. कुलकर्णी, नवलभाऊ फिरोदिया, जे. आर. डी. टाटा , रतन टाटा, आर. डी.आगा इत्यादींनी बांधकाम, स्टील, कापड , पेट्रोलियम, जहाजबांधणी, वाहन उत्पादन, सेवा क्षेत्र, संगणक, माहिती तंत्रज्ञान , हॉटेल व्यवसाय अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रचंड प्रमाणात भरारी मारलेली दिसून येते. यामुळे विविध ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या

व आर्थिक उलाढाल सुरू झाली. चलन व्यवस्थेला गती मिळाली. सर्वांगीण विकासाकडे देशाची वाटचाल हळूहळू सुरू झाली. भारत जवळपास सर्व क्षेत्रात स्वतःच्या पायावर उभा राहू लागला आणि महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागला.

उपरोक्त परिच्छेदातील खाजगी उद्योजकांबरोबरच महाराष्ट्र व देशभरात सहकाराचे वारे वाहू लागले होते. 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे लोक स्वतःच्या उन्नतीचे मार्ग शोधू लागले होते. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, श्री तात्यासाहेब कोरे इत्यादींनी 'सहकारातून समृद्धीकडे ' हा नवा मूलमंत्र दिला. त्यांनी कोणताही नवा उद्योग व्यवसाय हा सर्वांच्या एकत्रित आर्थिक व श्रमाच्या बळावर उभा केला जाऊ शकतो. तो उत्तमरीत्या चालविला जाऊ शकतो आणि त्यातून मिळालेल्या नफा सर्वांनी समप्रमाणात वाटून घेतल्यास सर्वांचा आर्थिक विकास होऊ शकतो. हे संपूर्ण जगाला दाखवून दिले. वरील सहकार महर्षींनी महाराष्ट्रामध्ये सहकारी तत्त्वावरील उद्योग व्यवसाय, कारखाने सुरू करून महाराष्ट्राच्या व पर्यायाने भारताच्या आर्थिक विकासात अनमोल योगदान दिलेले आहे. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरानगर येथे आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारून सहकारी साखर कारखानदारीचा आदर्श घालून दिला. साखर कारखान्याच्या जोडीला शैक्षणिक संस्था, दुग्ध संस्था, गट शेती , कुक्कुटपालन व्यवसाय, पतसंस्था इत्यादी गोष्टी सहकारी तत्त्वावरच कशा प्रकारे उत्तमरीत्या चालविल्या जाऊ शकतात याचा प्रत्यय आणून दिला. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व तात्यासाहेब कोरे यांनीही पश्चिम महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने, पतसंस्था, दुग्ध व्यवसाय इत्यादींचे जाळे उभारून सहकार चळवळीची मूहर्तमेढ रोवली.

वरील खाजगी व सहकारी क्षेत्रातील उद्योजक हे आपापल्या परीने महाराष्ट्राच्या व भारताच्या आर्थिक विकासात योगदान देत आलेले आहेत. यातील काही जणांना फार पूर्वीपासूनच वडिलोपार्जित उद्योग व्यवसायाची परंपरा आहे तर काहीजणांनी स्वतः धाडस करून स्वबळावर उद्योग व्यवसायाचा पाया घातलेला दिसून येतो. या सर्वांच्या कार्यकर्तृत्वामुळे खूप मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे. देशाची अर्थव्यवस्था गतिमान करण्यात या उद्योजकांचा खूप मोठा वाटा आहे. यामुळे ही व्यक्तिमत्व जनमानसात असामान्य दर्जाची व्यक्तिमत्व बनलेली आहेत जनमानसात त्यांच्याबद्दल प्रचंड आदर आहे. तेव्हा ह्या उद्योजकांच्या जडणघडणीचा, वाटचालीचा व कार्यकर्तृत्वाचा परिचय सर्वांना व्हावा या उद्देशाने त्यांचे चरित्र लेखन झालेले दिसून येते. त्यांचे चरित्रलेखक हे वेगवेगळया प्रेरणांनी प्रेरित होऊन उद्योजकांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणदोषांसह चित्रण करताना दिसतात. या चरित्रांमधून उद्योजकांच्या जीवनातील सर्व बाजूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. उद्योजकांच्या जीवनावरील चरित्र लेखनामुळे मराठीतील चरित्र वाड्.मय प्रवाह आणखीनच समृद्ध झालेला दिसून येतो.

इ.स.१९६५ साली खानोलकर गंगाधर देवराव यांनी वालचंद हिराचंद शेठ यांच्यावर लिहिलेल्या 'वालचंद हिराचंद: व्यक्ती, काळ व कर्तृत्व ' हे चरित्र उद्योजकांच्या जीवनावर लिहिलेले पहिले चरित्र म्हणून ओळखले जाते. इ.स. १९६५ पासून ही परंपरा आजतागायत अव्यातपणे सुरू आहे. त्यामध्ये प्रा. दातार मुकुंद व प्रा. पानसरे लिखीत तात्यासाहेब कोरे यांचे 'मी : एक कार्यकर्ता', डॉ. प्र.चिं. शेजवलकर लिखित श्री.चांदमल कटारिया यांचे 'श्री चांदमल कटारिया ', पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे राजा मंगळवेढेकर यांनी लिहलेले 'भूमिपूत्र', सविता भावे लिखित शंतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचे ' कालापुढती चार पावले', श्री नरहर वामन लिमये लिखित

निळकंठराव कल्याणी यांचे 'कल्याणी काळ.... व्यक्ती... कर्तृत्व ....दर्शन', शरद दांडेकर लिखित नानासाहेब दांडेकर यांचे 'नानासाहेब दांडेकर : एक आधारवड', राजा मंगळवेढेकर लिखित नवलमलजी फिरोदिया यांचे 'नवलकथा : एका पुरुषार्थाची', नीला सत्यनारायण यांनी आपल्या पतीच्या कार्यकर्तृत्वावर लिहलेले ' सत्यकथा ' प्रकाश बियाणी व कमलेश माहेश्वर लिखित आणि रेणुकादास देशपांडे अनुवादित लक्ष्मीनिवास मित्तल यांचे ' लक्ष्मीनिवास मित्तल स्टील किंगच्या यशाची कहाणी', रवींद्र कोल्हे लिखित धीरजलाल ( धीरूभाई ) हिराचंद अंबानी यांचे ' कार्पोरेट गुरू धीरूभाई अंबानी', सुधीर सेवेकर लिखित रतन नवल टाटा यांचे 'कार्पोरेट आयडॉल रतन टाटा', राहुल सिंघल लिखित व रवींद्र कोल्हे अनुवादित नारायण रामराव मूर्ती यांचे 'कार्पोरेट गांधी... नारायण मूर्ती', हरिचंद्र मगर लिखित शंकराव मोहिते पाटील यांचे 'महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव मोहिते-पाटील', श्री. सुधीर सेवेकर व श्री. उत्कर्ष सेवेकर लिखित बिल गेटस् यांचे ' संगणक युगाचा महानायक बिल गेट्स', तानाजी एकोंडे लिखित आर.डी. आगा यांचे 'कर्मयोगी- थरमॅक्समॅन आर. डी.आगा' इत्यादी चरित्रांचा समावेश होतो, या सर्व चरित्रांच्या अनुषंगाने उद्योजकांच्या जीवनावरील चरित्रलेखनच्या प्रेरणा आपणांस पाहावयाच्या आहेत.

## मराठीतील उद्योजकाच्या चरित्रलेखनाच्या प्रेरणा :-

कोणताही प्रतिभावंत लेखक आपल्या कलाकृतीची निर्मिती करण्याअगोदर स्वतः अनुभूती घेतो व मगच त्या अनुभूतीला आविष्कृत करतो. त्याची ती कलाकृती आविष्कृत होत असताना स्वतःचे एक वैशिष्ट्यपूर्ण रूप घेवून आकाराला येत असते. त्याच्या या आविष्काराचा एक स्वतंत्र घाट असतो व तो लेखकपरत्त्वे भिन्न-भिन्न असतो. त्या आविष्कारामागे त्या प्रतिभावंताचे स्वतःचे एक तंत्र, शास्त्र असते.तो काही संकेतही पाळत असतो. यामुळे प्रत्येकाची कलाकृती ही इतरांच्या कलाकृतीपेक्षा भिन्न ठरते. अनुभवलेले व वाचलेले यांच्या जोडीला लेखक आपली सृजनशील प्रतिभा वापरून कलाकृती निर्माण करत जातो. मराठीतील उद्योजकांच्या चरित्रातून येणारे उद्योजकांचे व्यक्तिमत्त्व व कार्य हे चरित्रकारांनी प्रत्यक्ष पाहिलेले, अनुभवलेले, ऐकलेले व वाचलेले असते. यामधून तो प्रभावित होत जातो व त्याच्या मनात एका कलाकृतीचे बीज अंकुरण्यास सुरूवात होते. हे बीज अंकुरण्यास वेगवेगळी कारणे अथवा प्रेरणा असू शकतात. मराठीत इ. स. १९६५ पासून उद्योजकांच्या व्यक्तिमत्त्व व जीवनावर चरित्रलेखन करण्याची परंपरा सुरू झाली. ही चरित्रे लिहिण्यापाठीमागे विविध कारणे अथवा प्रेरणा आहेत त्याचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे-

## १. उद्योजकांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्यकर्तृत्त्वाचा परिचय देणे :-

उद्योजकांचे व्यक्तिमत्त्वांचे कार्यकर्तृत्त्व हे सर्वसामान्यांना माहिती व्हावे, त्यांच्यापासून इतरांनी प्रेरणा घ्यावी या उद्देशाने उद्योजकांच्या चरित्राचे लेखन झालेले दिसून येते . बहुतांशी उद्योजक हे तळागाळातून येवून मोठे झालेले आहेत. फारच थोड्या लोकांना पूर्वजांचा वारसा लाभलेला आहे. तळागाळातून वर जाऊन उद्योजक बनलेल्या व्यक्तीविषयी समाजाला अपार आदर असतो. त्यामुळे समाजाला त्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व कार्यकर्तृत्त्व जाणून घेण्याची इच्छा असते . ही इच्छापूर्ती करण्याच्या उद्देशाने ' कार्पोरेट गांधी नारायण मूर्ती '

यांच्या जीवनावरील चरित्र राहुल सिंघल यांनी लिहिलेले दिसून येते. त्याचा मराठी अनुवाद रवींद्र कोल्हे यांनी केला आहे. रवींद्र कोल्हे आपल्या मनोगतात म्हणतात," मोठ्या प्रमाणात संपत्ती निर्माण केल्यानंतरही त्याचा सर्वसामान्य माणसासाठी आणि समाजासाठी वापर करुन मूर्ती यांनी संपूर्ण उद्योगजगतासमोर आदर्श निर्माण केला आहे. एक सामान्य माणूस ते यशस्वी उद्योजक असा प्रवास करताना आदर्श नीतिमूल्यांची जोपासना त्यांनी केली. तडजोड न करता सडेतोड वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून मूर्ती प्रेरणादायी आहेत. मूर्ती यांच्यापासून शिकण्यासारखे खूप काही आहे. नवीन उद्योजकांसाठी ते खराखुरा आदर्श आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेचे नेतृत्त्व करायला निघालेल्या देशात मोठ्या प्रमाणात उद्योजक तयार होण्याची गरज आहे. अशा होतकरू उद्योजकांना प्रेरणा घेण्यासाठी मूर्ती यांचे चरित्र एकमेव आहे याबद्दल शंका नाही."[१] यांच्या वरील कथनातून त्यांची लेखनप्रेरणा आपल्या लक्षात येते. ते आपल्या या चरित्रातून नारायण मूर्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्यकर्तृत्त्वाचा परिचय सर्वसामान्यांना करून देताना दिसतात.

## २. समाजाला उद्योगप्रधान बनविणे किंवा उद्योग व्यवसायाची दिशा दाखविणे :-

भांडवलदारी अर्थव्यवस्थेमध्ये मालक व कामगार हे दोन वर्ग असतात. ते परस्परपूरक असतील तर उद्योग व्यवसाय बहरत जातो. समाजातील सर्वच व्यक्ती या उद्योगपती नसतात. त्यातील काही मोजक्या व्यक्ती आपल्या अफाट बुद्धीमत्तेच्या व भांडवलाच्या जोरावर उद्योग व्यवसाय उभा करतात व त्यात यशस्वी होतात . अशा यशस्वी व्यक्तिमत्त्वाचा समाजाला हेवा वाटतो . त्यांना समाजात मानाचे स्थान असते. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपणही उद्योगपती बनावे. गडगंज संपत्ती कमवावी, विविध क्षेत्रात कार्यकर्तृत्त्व गाजवावे अशी प्रत्येकाच्या मनात सूप्त इच्छा असते. अशा इच्छा आकांक्षाना ही चरित्रे बळकटी देतात. उद्योगपतींची चरित्रे वाचून एखादा सर्वसामान्य व्यक्ती प्रेरित होण्याची शक्यता असते व त्यामधून यशस्वी उद्योजक निर्माण होवू शकतो. समाजाला उद्योगप्रधान बनविण्यासाठी व उद्योग व्यवसायाची दिशा दाखविण्यासाठी रवींद्र कोल्हे यांनी 'कार्पोरेट गुरू धीरूभाई अंबानी' हे धीरूभाई अंबानी यांच्या जीवनावरील चरित्र लिहिलेले दिसून येते. या चरित्रलेखनाची प्रेरणा सांगताना ते म्हणतात," हे चरित्र वाचून अडचणींचा पाढा वाचणाऱ्या आणि काय करावं, असा प्रश्न इतरांना विचारणाऱ्या अनेकांना नवीन काहीतरी करण्यासाठी प्रेरणा आणि दिशा मिळेल, इतकी मात्र मला नक्की खात्री आहे. अगदीच रिलायन्ससारखे मोठे नाही तरी किमान स्वावलंबी होण्याइतका उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी काही वाचकांना यापासून प्रेरणा मिळाली, तर हे चरित्र लिहिण्यामागचा माझा उद्देश सफल झाल्याचे समाधान मला मिळेल. " [२] रवींद्र कोल्हे यांच्या उपरोक्त मनोगतातून त्यांची समाजाला उद्योगप्रवण बनविण्याची आंतरिक उर्मी आपल्या लक्षात येते.

## ३. युवा पिढीला व कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळण्यासाठी :-

कोणत्याही देशातील तरूण वर्ग हे त्या देशाचे फार मोठे बलस्थान असते . हा युवा वर्ग ही खूप मोठी उर्जा असते. या युवा पिढीला अथवा कार्यकर्त्यांना निश्चित अशी दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य राज्यकर्त्यांचे असते. या युवा वर्गाला निश्चित दिशा न मिळाल्यास देश अराजकतेकडे झुकू शकतो. या युवा पिढीला निश्चित दिशा व प्रेरणा

देण्याचे काम पुस्तके करत असतात. युवकांमधील प्रचंड मोठ्या उर्जेला उद्योग व्यवसायाकडे वळविण्याचे काम उद्योगपतींच्या जीवनावरील चरित्रे करत असतात किंबहुना काही चरित्रकारांनी हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून चरित्रलेखन केलेले दिसून येते.

प्रा. विजय पानसरे व प्रा . मुकुंद दातार हे तात्यासाहेब कोरे यांच्या जीवनावरील ' मी एक कार्यकर्ता 'या चरित्रातील' या ग्रंथाचे औचित्य' यातील ग्रंथनिर्मितीचा प्रवास वाचल्यास आपणास या प्रेरणेचा प्रत्यय येतो." तात्यासाहेबांचे हे विलक्षण प्रभावी आणि प्रेरक जीवन शब्दबद्ध व्हावे असा विचार षष्ठयब्दिपूर्ती समारंभ समितीच्या मनात आला . त्यांचे आयुष्य कर्तृत्त्वाचा एक आदर्शपाठ आहे. हा आदर्शपाठ जर शब्दबद्ध झाला तर त्यातून युवक पिढीला व कार्यकर्त्या मंडळींना निश्चित प्रेरणा लाभू शकेल. या विश्वासाने आम्ही तात्यासाहेबांना आपले आयुष्य शब्दबद्ध करण्याची विनंती केली. "[३] उपरोक्त विवेचनातून लेखकाची लेखनप्रेरणा आपल्या लक्षात येते.

### ४. समाजधुरिणांचे विशिष्ट वय पूर्ण झाल्यानंतर साजऱ्या केल्या जाणाऱ्या समारंभात स्मरणिका , चरित्र अथवा गौरवग्रंथ प्रकाशित करणे :-

आपणाकडे ज्येष्ठ उद्योजक, समाजसेवक, राजकारणी इ. लोकांचे विशिष्ट वय पूर्ण झाल्यानंतर समारंभपूर्वक मागील आयुष्याचा आढावा घेण्याची पद्धत रूढ असलेली दिसून येते . यास थोडक्यात 'सिंहावलोकन' असेही म्हणता येते. याप्रसंगी त्या व्यक्तीच्या पूर्वायुष्यातील आठवणींना व कार्यकर्तृत्त्वाला उजाळा देण्यात येतो. कधी-कधी असामान्य कर्तृत्त्व गाजविलेल्या त्या व्यक्तीच्या जीवनावर एखादी स्मरणिका, विशेषांक, गौरवग्रंथ अथवा चरित्र प्रसिद्ध केले जाते . यामधून सत्कारमूर्तीच्या परिचित असणारे लोक आपापले अनुभव कथन करतात. यातून त्या व्यक्तीची सामाजिक उंची वाढत जाते. कधी-कधी एखादा चरित्रकार त्यांच्या कार्याने प्रभावित होवून चरित्राचे लेखन करतो व त्याचा प्रकाशन समारंभ अशाच एखाद्या कार्यक्रमात घडवून आणतो. त्याचे हे लेखन व प्रकाशन समारंभ ही त्याने सत्कारमूर्तीप्रती व्यक्त केलेली मानवंदना असते. उदा. सविता भावे यांनी शंतनुराव किर्लोस्कर यांच्या जीवनावरील ' कालापुढती चार पाऊले ' हे चरित्र त्यांच्या अमृतमहोत्सवाच्या सोहळयाच्या समयी प्रकाशित करून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

### ५. उद्योजकांच्या विविध क्षेत्रातील योगदानाची माहिती देणे : -

भारतातील व भारताबाहेरील उद्योजकांनी आपला एकमेव उद्योग सुरू केल्यानंतर त्याच उद्योगावर समाधान मानलेले दिसून येत नाही. नव्हे-नव्हे तर ही उद्योगक्षेत्राची रीतच आहे . आपला मुख्य उद्योग व्यवस्थित चालू झाल्यानंतर अथवा भरभराटीला आल्यानंतर त्या उद्योगास पूरक उद्योग बऱ्याचशा उद्योजकांनी सुरू केलेले दिसून येतात. काही उद्योजकांनी या चाकोरीच्या बाहेर जावून धाडसीपणाने एकदम नवख्या उद्योगामध्ये उडी मारलेली दिसून येते. एक उद्योग चालविण्याचा अनुभव पाठीशी असल्याने ते अन्य उद्योग व व्यवसायातही यशस्वी झालेले दिसून येतात. असे हे व्यवसायाचे जाळे सर्वत्र पसरवून काही उद्योजकांनी संपूर्ण बाजारपेठ काबीज केलेली दिसून येते. या सर्वच उद्योगातील सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञान त्यांना असतेच असे नाही. मात्र त्यांनी त्या त्या क्षेत्रातील

ज्ञानी माणसे आपणाकडे ओढून अथवा पदरी बाळगून त्या क्षेत्रात जोरदार मुसंडी मारलेली दिसून येते. अशा विविध क्षेत्रामध्ये योगदान देणार्या उद्योजकांच्या व्यक्तिमत्त्वाने चरित्रकार भारावलेला असतो. अशा व्यक्तिमत्त्वाच्या विविध क्षेत्रातील योगदानाची माहिती समग्र समाजाला करून देण्यासाठी तो चरित्रलेखन हाती घेताना दिसून येते.उदा. सविता भावे लिखित शंतनुराव किर्लोस्कर यांचे व्यक्तिमत्त्व चित्रित करणारे 'कालापुढती चार पाऊले' हे चरित्र. या चरित्राच्या 'समग्र आवृत्तीची प्रस्तावना' मध्ये निळकंठ कल्याणी म्हणतात की," कै. शंतनुराव हे विसाव्या शतकातील एक महापुरूष होते. त्या शतकाच्या उत्तरार्धातील स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या आणि देशाच्या औद्योगिक, आर्थिक, सामाजिक विकासामधील त्यांचे योगदान अपूर्व असे होते . त्याची नोंद इतिहासात होण्याच्या दृष्टीने आणि भावी पिढ्यांना त्यापासून स्फूर्ती मिळण्यासाठी त्यांचे समग्र चरित्र जनतेसमोर येणे आवश्यकच होते आणि ती कामगिरी सविता भावे यांनी या ग्रंथरूपाने समर्थपणे पार पाडली आहे . याचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे . "[४] नीळकंठराव कल्याणी यांनी सविता भावेंच्या लेखनाविषयी व्यक्त केलेले उपरोक्त मत हे त्यांच्या लेखनाची प्रेरणा सांगून जाते.

## ६. उद्योजकांच्या कार्याच्या स्मृती टिकवून ठेवणे :-

कोणताही उद्योजक आपला उद्योग अथवा व्यवसाय शून्यातून उभा करत असतो. फारच थोड्या उद्योजकांना वंशपरंपरेने उद्योग व्यवसायाचा वारसा लाभलेला असतो. स्वकष्टाने उभ्या केलेल्या या व्यवसायाची उत्तरोत्तर वाढ होत गेल्यानंतर कोणताही उद्योजक अन्य क्षेत्राकडे आपली पावले वळवतो. अशा कित्येक क्षेत्रामध्ये आपले उद्योग व्यवसायाचे जाळे विणल्यानंतर त्याच्याजवळ बऱ्याच मोठ्या प्रमाणात संपत्ती जमा होते. समाजातील अशा धनवान व्यक्तीकडून समाजासाठी काहीतरी सत्कार्य घडावे अशी सर्वांचीच अपेक्षा असते. या अपेक्षापूर्तीसाठी किंवा स्वयंप्रेरणेने तो उद्योजक वेगवेगळ्या प्रकारची आर्थिक मदत, दानधर्म, संस्था अथवा ट्रस्ट उभा करून आपल्याकडील काही रकमेचा विनियोग करू लागतो. त्याचे हे कार्य समाजोपयोगी असल्यामुळे समाजात त्या व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त होते. सबंध जीवनभर केलेल्या अशा विविध प्रकारच्या कार्याची नोंद सहसा कुणीही ठेवत नाही . जवळपास सर्वच जण अनेक प्रकारची कार्ये करत जातात. त्याबद्दल त्यांची समाजात वाहवा होते व पुढे काही काळानंतर लोकांना त्याचे विस्मरण होते. त्यांचे हे कार्य त्यांच्या समकालीन पिढीस किमानपक्षी माहीत तरी असते. मात्र पुढील पिढीस ते माहीत होण्याची शक्यता कमी असते. अशा या महान व्यक्तिमत्त्वांचा परिचय पुढील कित्येक पिढ्यास व्हावा या उद्देशाने चरित्रकार चरित्रलेखन करतो. उदा. राजा मंगळवेढेकर यांनी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या स्मृती चिरंतन टिकवून राहण्याच्या उद्देशाने 'भूमिपूत्र' या चरित्राचे लेखन केलेले दिसून येते. या ग्रंथाच्या 'सांगता' मध्ये प्रकाशकांनी लेखकाविषयी व्यक्त केलेली कृतज्ञता आपणास या प्रेरणेविषयी जाणीव करून देते. ते म्हणतात ," प्रवरेच्या परिसरातच नव्हे, तर आखिल सहकारी क्षेत्रातच पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील या नाममुद्रेला एक आगळेवेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. थोडक्यात गरीब शेतकऱ्याच्या घरात जन्म घेतलेल्या या भूमिपूत्राने ग्रामीण भागात औद्योगिक उन्नतीचा वसा घेतला आणि मराठमोळ्या महाराष्ट्राला उद्योग आणि सहकाराची नवी दिशा दाखविली. अशा पुरूषार्थी कर्तबगार पुरुषाचे जीवन आणि कार्य

अवघ्या मराठी माणसांपुढे ठेवावे अशी इच्छा आम्ही बऱ्याच दिवसापासून मनी बाळगलेली होती तिची आज या ग्रंथप्रकाराने सांगता होत आहे."५ यावरून या चरित्रलेखनापाठीमागील प्रेरणा आपल्या लक्षात येते.

## ७. उद्योजक म्हणजे भांडवलदार हा समज दूर करणे :-

बहुतांशी उद्योजक हे आपल्याकडील भांडवलाच्या जोरावरच उद्योग व्यवसायात यशस्वी ठरतात असा कित्येकांचा गैरसमज असतो. उद्योग - व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल आवश्यक असते हे जरी खरे असले तरी फक्त भांडवलावरच उद्योग व्यवसाय चालू शकत नाही. त्याची भरभराट होण्यासाठी त्याला कुशल मनुष्यबळाची आवश्यकता लागते. या दोन्हींच्या सुरेख समन्वयातून कोणताही उद्योग हळूहळू बाळसे धरू लागतो. काही उद्योग व्यवसाय सहकारी तत्त्वावर उदयाला आलेले असतात. तेथे भांडवलदार हा विषयच नसतो. मात्र तरीही पुढील काळात या दोन्ही प्रकारच्या उद्योग व्यवसायात मालक अथवा भांडवलदार व मजूर असा संघर्ष उभा राहतो. मजुरांच्या अथवा कर्मचाऱ्यांच्या मनात मालक अथवा भांडवलदार यांच्याबद्दल राग, द्वेष, घृणा, तिरस्कार निर्माण होत जातो . यापाठीमागे प्रामुख्याने आर्थिक कारण असते. अशा लोकांकडून संबंधित मालकाच्या अथवा उद्योजकाबद्दल समाजात वेगवेगळे गैरसमज पसरविले जाण्याची शक्यता असते. यामुळे कित्येक लोकांना रोजगार उपलब्ध करून देणारा उद्योजक बदनाम होण्याची शक्यता असते. त्याचबरोबर त्याने स्वतःला मिळालेल्या फायद्यातून केलेली कित्येक समाजोपयोगी कामे समाजाकडून दुर्लक्षित होण्याची भीती असते . यामुळे उद्योजक म्हणजे भांडवलदार हा गैरसमज दूर करणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू समाजासमोर आणणे महत्त्वाचे असते . बऱ्याच वेळा असा उद्देश डोळ्यासमोर ठेवून चरित्रकार चरित्रनिर्मिती करतात. श्री. नरहर वामन लिमये यांनी नीळकंठराव कल्याणी यांच्या जीवनावर लिहिलेले 'कल्याणी काळ ... व्यक्ती ... कर्तृत्त्व ... दर्शन ' हे चरित्र याच प्रेरणेतून लिहिलेले आपणास दिसून येते. ते या चरित्राच्या 'मी का लिहितो?' मध्ये म्हणतात की," पण नीळकंठराव कल्याणी यांचे चरित्र लिहावे असे वाटले, नव्हे उत्कटतेने वाटले याचे कारण माझ्या या तरूण मित्राने आपल्या अनोख्या क्षेत्रात खूप मोठे यश मिळवले आणि मिळवलेले यश कधी डोक्यावर चढू दिले नाही . ............सर्व गरीबीचे मूळ पारतंत्र्यात आहे असे पुढारी मंडळींनी सांगितले म्हणून आमची पिढी त्या स्वातंत्र्यलढ्याकडे वळली . येरवड्याचे रहिवासी झालो . लढ्याच्या काळात समाजामधील श्रीमंत-गरीब हा भेदभाव काही काळ कमी झाला . मला आठवते की , आमचे नेते जेधे - गाडगीळ काँग्रेसतर्फे त्या वेळच्या दिल्ली असेंब्लीला उभे राहिले. त्यांना विरोध करण्यासाठी प्रख्यात उद्योगपती वालचंद हिराचंद उभे राहिले. ( सन १९३४ ) माझी लेखणी आणि वाणी त्या थोर पुरुषावर तोंडसूख घेवू लागली . लोकशाहीतील सभ्यता, संयम कळण्याचे वय नव्हते. पक्षाचा अभिनिवेश होता आणि धनिकाबद्दलची अप्रीतीची बैठक होती. आमचे स्थानिक नेते कै. भाऊसाहेब सोमण यांनी पहिला धडा दिला . जेधे गाडगीळ निवडून आल्यानंतर मी सातारा शहरातल्या मुख्य चौकात पेढ्यांचे मोठे टोपले घेवून सर्वांना वाटत होतो. नाचतच होतो म्हणाना! भाऊसाहेब तिकडून येत होते. त्यांनी माझा उतू चाललेला उत्साह पाहिला आणि म्हणाले 'मला वालचंद निवडून यावेसे वाटत होते. मी अवाक झालो. भाऊसाहेब आमचे नेते जेधे गाडगीळांकरीता भरपूर प्रयत्न केलेले मी पाहत राहिलो. तेव्हा ते म्हणाले, विजय विनयाने घ्यावा

आणि पराजय धैर्याने पचवावा. वालचंद तुला कळले नाहीत."[६] लिमयेंच्या उपरोक्त कथनातून त्यांची लेखनाप्रेरणा ही उद्योजक म्हणजे भांडवलदार हा समज दूर करणारी आहे.

### ८. उद्योजकाच्या औद्योगिक , सामाजिक कार्याचा परिचय करून देणे : -

सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येवून आपल्या बुद्धीमत्तेच्या व अन्य गुणांच्या बळावर एखादा तरूण उद्योजक बनतो. भविष्यात तो यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करतो. लघुउद्योगांपासून केलेली सुरूवात तो विस्तारत नेतो व मोठ्या उद्योगधंद्यामध्ये स्थिर होतो . यासाठी ते विविध युनिट कार्यरत करतात. यामधून त्यांचा औद्योगिक व्याप वरचेवर वाढत जातो. याच्या जोडीला तो आपण समाजाचा एक घटक म्हणून समाजाचे काही देणे लागतो ही भावना मनात जोपासत असतो. या जाणिवेतून तो वेगवेगळी समाजोपयोगी कामे करतो. वेगवेगळ्या उपक्रमांना देणग्या किंवा फंड देतो . काही संस्था किंवा ट्रस्ट यांची निर्मिती करतो . शाळा, दवाखाने , वृद्धाश्रम इ. ची उभारणी करून सामाजिक कार्याचा वसा हाती घेतो. अशा प्रकारचे त्याचे सामाजिक कार्य हे लोकांपर्यंत सहसा पोहोचत नाही. जनमाणसामध्ये त्याची ओळख ही फक्त उद्योजक म्हणून असते. सर्वसामान्य लोक हे त्या व्यक्तीला त्याच्या उद्योग-व्यवसायाशी जोडताना दिसतात. अशा लोकांपर्यंत उद्योजकाचे औद्योगिक व सामाजिक कार्य पोहोचवावे, त्या कार्याचा त्यांना परिचय व्हावा या उद्देशाने चरित्रकार चरित्रलेखन करताना दिसतात. उदा. सुधीर सेवेकर यांनी रतन टाटा या उद्योजकाविषयी लिहिलेल्या 'कार्पोरेट आयडल रतन टाटा' या चरित्राचे लेखन करण्याची प्रेरणा सांगताना 'दोन शब्द'मध्ये असे म्हटले आहे की, "शिवाय जागतिक ख्यातीच्या एका मोठ्या उद्योजकावर लिहायचे होते. सचोटी, गुणवत्ता, विश्वासार्हता अशा अनेक चांगल्या मूल्यांचे उद्योग - व्यवसाय क्षेत्रातील एक मोठे उदाहरण म्हणजे टाटा ग्रुप त्यांच्या अध्यक्षाविषयी लिहायचे होते. ही गोष्ट एक अभ्यासक, एक लेखक या नात्याने मला विलक्षण महत्त्वाची वाटत होती. "[७] या त्यांच्या मनोगतातून त्यांची रतन टाटांवर चरित्रलेखन करण्याची प्रेरणा आपणासमोर येते.

### ९ . महान व्यक्तीच्या कर्तृत्त्वाचा व दातृत्त्वाचा परिचय करून देणे :-

औद्योगिक क्षेत्रात असामान्य कामगिरी करणाऱ्या बहुतांशी उद्योजकांनी आपले कर्तृत्त्व अन्य क्षेत्रातही सिद्ध केले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील यशाची शिखरे पादाक्रांत करून त्यांचा विजयी अश्वरथ चौखूर उधळलेला दिसून येतो. या सर्व व्यवसायाबरोबरच त्यांनी सढळपणे दान देवून आपला दानशूरपणा दाखवून दिलेला आहे. काही उद्योजकांनी अनाथ मुलांची पालन-पोषणाची जबाबदारी स्वीकारुन, तसेच काहींनी अनाथाश्रम काढून समाजातील फार मोठा ज्वलंत प्रश्न हाताळला आहे. तसेच वृद्धाश्रमाची निर्मिती करून, त्यांना देणग्या देवून आपल्या दातृत्त्वाचा परिचय सर्वांना करवून दिला आहे. त्यांच्या या दातृत्त्वाचे अनेक कंगोरे आपणाला पहावयाला मिळतात. अशा या उद्योगपतीचे कर्तृत्त्व व दातृत्त्व यांचा सर्वसामान्यांना परिचय व्हावा यासाठी चरित्रकारांनी चरित्रलेखन केलेले दिसून येते. तानाजी एकोंडे यांनी आर. डी. आगा यांच्या कर्तृत्त्वाचा व दातृत्त्वाचा परिचय सर्वांना व्हावा यासाठी 'कर्मयोगी' या चरित्राचे लेखन केलेले दिसून येते. या चरित्रलेखनाची प्रेरणा सांगताना ते सुरूवातीच्या मनोगतात म्हणतात,"अशा महान व्यक्तीचे कर्तृत्त्व आणि दातृत्त्व सामांन्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने प्रथम मी

आगासाहेबांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला आणि मग त्यांच्याविषयी लिहिण्याचा प्रयत्न केला . पण त्यांच्या कर्तृत्त्वाची व्याप्ती इतकी मोठी आहे की , ते सर्व माझ्या विचारांच्या कवेत येणे केवळ अशक्य होते. त्यासाठी आगासाहेबांच्या सानिध्यात राहिलेल्या अनेक विद्वानांचा मी सल्ला घेतला. तो शिरसावंद्य आहे. त्यांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहकार्यामुळेच आगासाहेब आणि त्यांच्या कर्तृत्त्वातून निर्माण झालेला थरमॅक्स उद्योग ( सुद्धा ) आपल्यासमोर मांडण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला . त्यातून मिळालेले यश म्हणजेच 'कर्मयोगी'( थरमॅक्समॅन आर . डी. आगा ) हे माझे पुस्तक होय."[८] त्यांच्या या मनोगतातून त्यांची उपरोक्त लेखनप्रेरणा आपणाला दिसून येते.

## १०. शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील कर्तृत्त्वाचा परिचय करून देणे :-

बहुतांशी भारतीय उद्योजकांनी आपल्या उद्योग - व्यवसायाला सांभाळून सामाजिक बांधिलकीचे भान राखले आहे. उद्योग - व्यवसायाला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ अथवा कार्यालयीन कर्मचारी वर्ग हा ज्या शाळा-महाविद्यालयातून तयार होतो. त्या शाळा महाविद्यालयाच्या विकासासाठी निधी दिला आहे. काहींनी तर थेट संस्थांची स्थापना करून त्या संस्थेअंतर्गत वेगवेगळे शैक्षणिक विभाग सुरू केलेले आहेत. शिक्षणाची ही ज्ञानगंगा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम उद्योजकांनी सढळ हाताने केले आहे. यामधून सर्वसामान्यांची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आली व स्थिरस्थावर झाली. सर्वसामान्य आर्थिक परिस्थिती असलेल्या काही तरूण उद्योजकांनी सहकाराचा मार्ग अनुसरलेला दिसून येतो. त्यांनी सहकारी तत्त्वावर उद्योग-व्यवसायाची पायाभरणी करून आपल्याबरोबर विकासाच्या प्रवाहात आणले. या सहकारी तत्त्वावरील उद्योग - व्यवसायाच्या जोडीने त्यांनी अनेक उपप्रकल्प कार्यान्वित केलेले दिसून येतात. त्यांच्या या दूरदृष्टीमुळे सर्वांचाच लाभ झालेला दिसून येतो. 'सहकारातून समृद्धीकडे' हा सहकारी चळवळीचा मूलमंत्र खऱ्या अर्थाने रूजविण्यात ते यशस्वी ठरले आहेत. अशा सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या उद्योजकांनीही शैक्षणिक क्षेत्रात योगदान दिलेले आहे. त्यांनीही शैक्षणिक संस्थांची स्थापना करून खेडोपाडी शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचवली व शिक्षण सर्वसामान्यांच्या दरापर्यंत नेवून पोहोचविले. अशी ही शैक्षणिक व सहकार क्षेत्रात कर्तृत्त्व गाजविणारी व्यक्तिमत्त्वे चरित्रकारांना चरित्रलेखन करण्यास प्रवृत्त करताना दिसतात. यशवंतराव चव्हाण यांनी विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या जीवनावर राजा मंगळवेढेकर यांनी लिहिलेल्या चरित्राच्या प्रस्तावनेत चरित्रकाराची लेखनप्रेरणा विशद केली आहे . ते म्हणतात, " श्री. विखे पाटील यांचे नाव आज सर्वसामान्य व सर्वपरिचित असे आहे. परंतु ते जेव्हा कुणाला माहिती नव्हते, तेव्हा त्यांनी ज्या गुणांच्या विचारांच्या व स्वभावाच्या बळावर आपले व्यक्तिमत्त्व घडविले ते गुण, विचार व स्वभाव यांची जोपासना करण्याची नित्यच गरज राहील. म्हणून अशा चरित्र ग्रंथांची आवश्यकता आहे. लेखकाने कष्टपूर्वक माहिती मिळवून ती शैलीदार पद्धतीने मांडली आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद ! सहकारी क्षेत्रातील सर्व कार्यकर्त्यांनी मनःपूर्वक हे पुस्तक समजावून घ्यावे अशा योग्यतेचे आहे. असे मला वाटते."[९] यशवंतराव चव्हाणांच्या उपरोक्त विचारातून विठ्ठलराव विखे पाटील यांचे शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील योगदान आपल्या लक्षात येते. याशिवाय राजा मंगळवेढेकर यांची चरित्रलेखनाची प्रेरणाही लक्षात येते.

### ११. पूर्वजांचा उद्योग वारसा भावी पिढ्यांपुढे मांडणे :-

भारतातील काही उद्योजकांना उद्योग व्यवसायाचा वारसा पूर्वपरंपरेने आपल्या वाडवडिलांकडून मिळालेला आहे. त्यांच्या पूर्वजांनी रोवलेली उद्योग-व्यवसायाची मुहूर्तमेढ आज वटवृक्षाप्रमाणे प्रचंड बहरलेली आहे. असा हा बहरास आलेला उद्योग-व्यवसाय त्यांनी आपल्या वारसांच्या हाती सोपवून या जगाचा निरोप घेतलेला दिसून येतो. यामध्ये प्रामुख्याने जमशेदजी टाटा, धीरूभाई अंबानी, लक्ष्मणराव किर्लोस्कर, विठ्ठलराव विखे पाटील इ. व्यक्तिमत्त्वाचा उल्लेख आपणाला करता येतो. आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्त्वाबद्दल त्यांच्या वारसांच्या मनामध्ये अपार आदर, प्रेम, निष्ठा व अभिमान आहे. या अभिमानापोटीच काही वारसदारांनी आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्त्वाचा इतिहास समाजासमोर लिखित स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या उद्योग-व्यवसायाचे श्रेय हे आपल्या पूर्वजांचे आहे हे जाहिररीत्या सांगण्यास त्यांना कोणताही संकोच वाटत नाही. ते या उद्योगक्षेत्राचे सर्व श्रेय आपल्या चरित्र लेखनातून आपल्या पूर्वजांना जाहिररीत्या देताना दिसून येतात. पूर्वजांना मिळालेला वारसा इतरांना सांगण्याची उर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नाही. यातूनच काही चरित्रांची निर्मिती झालेली दिसून येते. उदा. शरद दांडेकर यांनी आपले वडील नानासाहेब दांडेकर यांच्याकडून आपणास मिळालेले बाळकडू जाहिररीत्या मांडले आहे. नानासाहेबांकडून आपल्याला लाभलेला उद्योगवारसा व त्यांच्या अन्य स्मृती यांचे चित्रण त्यांनी 'नानासाहेब दांडेकर: एक आधारवड' या चरित्रातून भावी पिढ्यांपुढे मांडले आहे . ते या चरित्राच्या प्रस्तावनेत म्हणतात की," आपल्या पूर्वसुरींनी काय आदर्श निर्माण केला, कशा प्रकारचे जीवन ते जगले व त्यांतून लोककल्याण साधू शकले याचा अभ्यास व्हावयास पाहिजे असे उत्कटतेने वाटून चरित्रलेखनाचा घाट मी घातला . दांडेकरांच्या भावी पिढ्यांना त्यापासून प्रेरणा मिळेलच , परंतु इतरांनाही ते उद्बोधक वाटल्यावाचून राहणार नाही असा मला विश्वास वाटतो."[१०] शरद दांडेकर यांच्या या मनोगतातून त्यांची लेखनप्रेरणा आपणासमोर येते.

### १२. प्रकाशकांच्या सूचनेवरुन अथवा आग्रहावरुन चरित्र लेखन :-

मराठी साहित्यातील काही चरित्रांचे लेखन हे प्रकाशकांच्या सूचनेवरुन अथवा आग्रहावरुन झालेले दिसते . लेखकापेक्षा प्रकाशक अथवा विक्रेता यांचा वाचकांशी अधिक जवळचा संबंध येत असतो. यामुळे वाचकांची मागणी काय आहे हे विक्रेत्याद्वारा प्रकाशकाला समजत असते. यामुळे वाचकांची तृष्णा शमविण्यासाठी कोणकोणते लेखनविषय दुर्लक्षित आहेत व त्यांच्यावर लेखन होणे किती महत्त्वाचे आहे. याची जाणिव प्रकाशकाला होते. मार्केटमध्ये विशिष्ट विषयावरील पुस्तकांची मागणी असेल व प्रत्यक्षात त्याविषयावरील पुस्तके उपलब्ध नसतील तर काही प्रकाशक याप्रसंगी पुढाकार घेताना दिसून येतात. प्रकाशक हा स्वतः लेखक नसल्यामुळे तो हे कार्य लेखकाला करण्यासाठी आग्रह करतो अथवा सूचना देतो. कधीकधी प्रकाशकाला एखाद्या उद्योजकाविषयी अपार आदर व श्रद्धा असते. या आदर व श्रद्धेतून तो लेखकाकडून चरित्रलेखनाचे कार्य करवून घेतो. वेळप्रसंगी लेखकाला माहितीचे स्रोत, संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन देतो. तसेच लेखकाशी चर्चाही करतो. अशा प्रक्रियेतून काही उद्योजकांचे व्यक्तिमत्त्वचित्रण चरित्ररूपाने झालेले दिसून येते. उदा. माधुरी शानभाग यांनी ' जे. आर. डी. टाटा यांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण करणारे ' जे. आर. डी. एक चतुरस्त्र माणूस' हे चरित्र मेहता प्रकाशनचे श्री. अनिल मेहता यांच्या सूचनेवरून लिहिलेले दिसून येते. जे. आर. डी. टाटा यांच्याविषयी त्यांनी लिहिलेला एक लेख आवडल्यामुळे

श्री . अनिल मेहता यांनी जे . आर. डी. टाटा यांचे चरित्र लिहिण्याची सूचना त्यांना केली व ते प्रकाशित करण्याची तयारी दर्शविली. या चरित्राच्या लेखनाची प्रेरणा सांगताना त्या 'दोन शब्दा'मध्ये म्हणतात की,"श्री.अनिल मेहता यांच्या सूचनेवरून हे पुस्तक लिहून झाले. श्री. मेहता यांचे मनःपूर्वक आभार."[११] माधुरी शानभाग यांच्या या कृतज्ञतापूर्वक उल्लेखातून या चरित्राच्या लेखनामागील प्रेरणा आपल्या लक्षात येते.

### १ ३. कामगारांना कंपनी व उद्योजकाविषयीआस्था असणे :

उद्योजकावरील चरित्र लेखनामध्ये त्रयस्थ लेखकांबरोबर त्या उद्योजकाच्या कंपनीतील अधिकारी किंवा कर्मचारी वर्ग यांचा समावेश असलेला दिसून येतो. कंपनीतील कर्मचारी अथवा कामगार यांना कर्तृत्त्वसिद्ध करण्याची संधी या उद्योजकांनी दिलेली असते. त्याचबरोबर त्यांचे आर्थिक प्रश्नही सोडविलेले असतात. यामुळे कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांनी आपल्या कंपनीच्या मालकाचे चरित्रलेखन केलेले आढळून येते. यामध्ये विशिष्ट उद्दिष्टप्राप्तीसाठी केलेला प्रयत्न असण्याची शक्यता नाकारता येत नाही . मात्र कारण काहीही असले तरी त्यानिमित्ताने का होईना मराठी साहित्यात एका उद्योजकाच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या चरित्रांची भर पडलेली दिसून येते. उदा. तानाजी एकोंडे यांनी आर. डी. आगा यांचे जीवनचित्रण करणारे 'कर्मयोगी' (थरमॅक्समॅन आर. डी. आगा) हे चरित्र लिहिलेले दिसून येते. सदर चरित्राचा लेखक हा आर. डी. आगा यांच्या कंपनीत जवळपास तीस वर्षे सेवा केलेले एक उच्चपदस्थ अधिकारी होते. त्यांचे व कंपनी व्यवस्थापनाचे एक वेगळेच नाते दृढ झाले होते. या चरित्रलेखनाची प्रेरणा सांगताना प्रस्तावनेत मेहेर पद्मजी म्हणतात की, "श्री. तानाजी एकोंडे हे थरमॅक्समध्ये ३० वर्षे काम करीत आहेत. खूप वर्षापूर्वी आपल्या कंपनीचा जपानमधील सॅनयो या कंपनीबरोबर सहकार्याच्या तत्त्वावर जोडीने काम चालू होते आणि त्यासंबंधात आपल्यापैकी आठ कामगारांना सहा महिन्यांसाठी जपानला पाठविण्यात आले होते. या प्रतिष्ठेच्या उपक्रमामध्ये श्री. एकोंडे यांचा समावेश त्या आठ जणांत होता."[१२] यावरुन तानाजी एकोंडे यांची कंपनी व आर . डी . आग यांच्याप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त होते व इतक्या वर्षाच्या कालखंडात जुळलेले ऋणाबंध स्पष्ट होतात व या ऋणानुबंधातूनच या चरित्राचे लेखन झालेले दिसून येते.

अशा प्रकारे मराठीतील उद्योजकांच्या जीवनावरील चरित्रनिर्मितीच्या प्रेरणा ह्या वेगवेगळया असलेल्या दिसून येतात. विभिन्न प्रेरणांनी प्रेरित झालेल्या चरित्रकारांनी नवनिर्मिती करून भारतातील तरूणांना एक वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. संबंध तरूण वर्गाला व सबंध समाजाला उद्योगप्रवण बनविण्याचा त्यांचा हा प्रयत्न चरित्रलेखनातून दिसून येतो. या चरित्रांच्या वाचनातून किमानपक्षी काही तरुणांनी उद्योग- व्यवसायाकडे वळावे व भारताच्या औद्योगिक विकासात हातभार लावावा. त्याचबरोबर अन्यही क्षेत्रांमध्ये आपला वेगळा ठसा उमटवावा अशी जवळपास सर्वच चरित्र लेखकांची सुप्त इच्छा असलेली दिसून येते . ही इच्छा सुद्धा त्यांची आंतरिक प्रेरणा म्हणावयास हरकत नाही. एकंदरीतच विचार करता उद्योजकांच्या जीवनावर चरित्रलेखन करणाऱ्या चरित्रलेखकांनी मराठीतील चरित्र वाङ्.मयप्रवाह समृद्ध केला असे आपणास म्हणता येते.

संदर्भ :-

१. सिंघल राहुल ( अनु . कोल्हे रवींद्र ) , ' कार्पोरेट गांधी नारायण मूर्ती ' , ' मनोगत ' , साकेत प्रकाशन, औरंगाबाद, अकरावी आवृत्ती , २०१६

२. कोल्हे रवींद्र, 'कार्पोरेट गुरु धीरुभाई अंबानी ', 'मनोगत', साकेत प्रकाशन औरंगाबाद, सातवी आवृत्ती, २०१७

३. दातार मुकुंद व पानसरे विजय , ' मी एक कार्यकर्ता', 'आनंददृष्टी' , तात्यासाहेब कोरे षष्ठब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९७ , पृ . ४

४. भावे सविता , ' कालापुढती चार पाऊले', 'समग्र आवृत्तीची प्रस्तावना', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००४

५. मंगळवेढेकर राजा, 'भूमिपूत्र', 'सांगता', प्रवरा प्रकाशन प्रवरानगर ( अहमदनगर ), प्रथमावृत्ती, जानेवारी १९७७

६. लिमये नरहर वामन, 'कल्याणी काळ ... व्यक्ती ... कर्तृत्त्व ... दर्शन', ' मी का लिहितो ', गतिमान प्रकाशन पुणे , प्रथमावृत्ती, १९८८,

७. सेवेकर सुधीर, 'कॉर्पोरेट आयडॉल रतन टाटा', 'दोन शब्द', साकेत प्रकाशन औरंगाबाद, आठवी आवृत्ती, २०१६

८. एकोंडे तानाजी, 'कर्मयोगी ( थरमॅक्समॅन आर . डी . आगा ) ', 'मनोगत', भगीरथ प्रकाशन, पुणे -१७ , प्रथमावृत्ती २०१२ –

९. मंगळवेढेकर राजा, 'भूमिपूत्र', 'प्रस्तावना- यशवंतराव चव्हाण, प्रवरा प्रकाशन प्रवरानगर ( अहमदनगर ) , प्रथमावृत्ती , १९७७

१०.दांडेकर शरद, 'नानासाहेब दांडेकर एक आधारवड', 'मनोगत', निकेदा प्रकाशन, गांधीनगर, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९७

११. शानभाग माधुरी, 'जे. आर . डी. : एक चतुरस्त्र माणूस ', 'दोन शब्द', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती पुनर्मुद्रण -२०१२

१२. एकोंडे तानाजी, 'कर्मयोगी ( थरमॅक्समॅन आर . डी . आगा )', 'प्रस्तावना- मेहेर पद्मजी', भगीरथ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती-२०१२.